# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


======================================================================

जावक क्रमांक – ८१५/९१ दिनांक :- ०९ जुलै, २०२५

प्रसिद्धिपत्रक

## वन महोत्सव सप्ताहानिमित्त 'म्हाडा'तर्फे राज्यभर व्यापक वृक्षारोपण मोहीम सुरू

**म्हाडाचे दोन लाख वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट**

मुंबई, दि. ०९ जुलै २०२५ : जुलै महिन्यात साजरा होणाऱ्या वन महोत्सव सप्ताहाच्या निमित्ताने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा) राज्यभरात मुंबईसह सर्व विभागीय मंडळांमध्ये वृक्षारोपण मोहिमेला उत्साहात सुरुवात करण्यात आली आहे. सामाजिक बांधिलकीच्या तत्त्वावर गृहनिर्मिती करणाऱ्या 'म्हाडा'ने पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारत दोन लाख झाडांची लागवड करण्याचे मोठे उद्दिष्ट ठेवले आहे.

दि. १ जुलै, २०२५ पासून सुरू झालेल्या या वृक्षारोपण मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) क्षेत्रात सुमारे ५०,००० झाडे लावण्याचे काम सुरू झाले आहे. मुंबई मंडळातर्फे ५०,००० व कोकण मंडळातर्फे २५,००० झाडे म्हाडाच्या विविध गृहनिर्माण प्रकल्पांच्या आवारात लावली जात आहेत. पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर व अमरावती या विभागीय मंडळांनी प्रत्येकी २५,००० झाडे लावण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे.

मुंबई मंडळातर्फे विक्रोळीतील कन्नमवार नगर, मालाडमधील मालवणी आणि गोरेगाव येथील प्रकल्पांमध्ये या उपक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. तसेच समुद्र किनारी पर्यावरणाचे संवर्धन करणारी कांदळवन उभारण्याचे नियोजन देखील मंडळातर्फे करण्यात येत आहे.

नाशिक गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ आणि राह फाउंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने निमोण (ता. चांदवड, जि. नाशिक) येथील जैवविविधता उद्यानात १५,००० झाडे लावण्यात आली. या उपक्रमाला नाशिक मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. शिवकुमार आवळकंठे व राह फाउंडेशनच्या प्रतिनिधी श्रीमती कामत उपस्थित होते. शनिवार-रविवार असलेल्या सुट्ट्यांमध्ये मंडळातील प्रत्येक कर्मचाऱ्याने सक्रिय सहभाग घेत या उपक्रमाला हातभार लावला.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत उभारण्यात आलेल्या सोलापूर जिल्ह्यातील कुंभारली येथील रे नगर गृहनिर्माण प्रकल्प परिसरात पुणे मंडळातर्फे ९,५०० वृक्षांचे रोपण करण्यात आले. तसेच शिरूर येथे मंडळाचे पुणे सभापती श्री. शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. सासवड (अंबोडी रस्ता), खाउली (सातारा), पलूस (सांगली) येथील प्रकल्पांतही वृक्षारोपण करण्यात आले. उजळाईवाडीतील म्हाडा वसाहतीत सुमारे ६०० झाडे लावण्यात आली.

कोकण मंडळातर्फे रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील तळीये गृहनिर्माण पुनर्वसन प्रकल्प परिसरात ग्रामस्थांच्या सहकार्याने वृक्षारोपण करण्यात आले. खोणी, शिरढोण, भंडार्ली, गोठेघर येथील प्रकल्पांमध्येही मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्यात आली.

नागपूर मंडळातर्फे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातील मौजा नांदा (ता. कोपर्णा) येथील प्रकल्प परिसरात PM Infraventures,चंद्रपूर यांच्या सहकार्याने १,००० झाडांची लागवड सुरू करण्यात आली आहे. यावेळी नागपूर मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. महेशकुमार मेघमाळे आदी उपस्थित होते. मौजा देवाडा येथील प्रकल्पात ३०० झाडे, तर नागपूर कार्यालय तसेच वडधामना, गोधणी व बुटीबोरी येथील प्रकल्पांमध्येही वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला.

सोलापूर जिल्ह्यातील धाराशीव येथे १३ एकर जागेवर सर्वात मोठा वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत २० जुलै २०२५ रोजी धाराशीव येथील जेवळी गावी १५ हजार झाडे आठ एकर जागेवर लावण्यात येणार आहेत तर कस्ती गावातील ०५ एकर जागेवर ०५ हजार झाडे लावण्यात येणार आहेत.

म्हाडाच्या सर्व प्रकल्पांमध्ये लावली जाणारी झाडे पर्यावरणपूरक असून त्यांच्या निगा व देखभालीची जबाबदारी संबंधित गृहनिर्माण संस्थांकडे सोपविण्यात आली आहे. लवकरच जिओ-टॅगिंग प्रणालीद्वारे झाडांची नोंदणी आणि संवर्धन सुनिश्चित करण्यात येणार आहे.

सदर उपक्रम 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या निर्देशानुसार राबविण्यात येत आहे. या उपक्रमाविषयी 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल म्हणाले की, 'वाढते प्रदूषण आणि जागतिक तापमानवाढीच्या पार्श्वभूमीवर ही मोहीम अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. ही केवळ हरित आवरण वाढविण्याची मोहीम नसून भावी पिढ्यांसाठी निरोगी व समृद्ध पर्यावरणाची शाश्वती देणारे पाऊल आहे. राज्याच्या विकास प्रवासात नवीन घरे उभारणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच पर्यावरणाचा समतोल राखणेही आवश्यक आहे. शहरांच्या विकासाबरोबर सावली देणारी झाडेही वाढली पाहिजेत हेच या मोहिमेकरिता 'म्हाडा'चे नवे ब्रीद आहे.

सामाजिक बांधिलकी जपत 'म्हाडा'ने स्थापनेपासून आजवर नऊ लाखांहून अधिक घरांची निर्मिती केली आहे. आता या उपक्रमाद्वारे म्हाडा पर्यावरण रक्षणाच्या सामाजिक बांधिलकीलाही अधिक बळकट करत आहे.'

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East,
Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==================================================

Outward No. : 815/91 Dt. 09th July 2025

**Press Release**

# MHADA sets target of Two Lakh Tree Plantations across state under Van Mahotsav Initiative

**Tree plantation begins across divisional boards with focus on environmental conservation and community participation**

Mumbai, July 9, 2025: In connection with the observance of Van Mahotsav Week in July, the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) has initiated a state-level tree plantation initiative across all its divisional boards including Mumbai. As an organisation that has undertaken housing development with a commitment to social responsibility, MHADA has also taken on the responsibility of environmental conservation and has set a target of planting two lakh trees.

The initiative began on July 1, 2025. In the first phase, approximately 50,000 trees are being planted in the Mumbai Metropolitan Region (MMR). The Mumbai Board is planting 50,000 trees, while the Konkan Board is planting 25,000 trees across MHADA's housing project premises. The Pune, Nashik, Chhatrapati Sambhajinagar, Nagpur, and Amravati boards have each fixed a target of planting 25,000 trees.

In Mumbai, the initiative has started at MHADA's housing projects in Kannamwar Nagar (Vikhroli), Malvani (Malad), and Goregaon. The Mumbai Board is also planning mangrove plantation as part of its efforts for coastal environmental conservation.

The Nashik Board, in collaboration with Raah Foundation, Mumbai, has planted 15,000 trees at a biodiversity park located in Nimon (Taluka: Chandwad, District: Nashik). Chief Officer Mr. Shivkumar Awalkante and Raah Foundation representative Mrs. Kamat were present on this occasion. Employees from the board participated actively during weekends.

In Solapur district, under the Pradhan Mantri Awas Yojana (Urban), the Pune Board has planted 9,500 trees at the Re Nagar Housing Project site in Kumbharli. In addition, tree plantation was conducted at Shirur in the presence of Pune Board Chairman Mr. Shivajirao Adhalrao Patil. Activities have also been carried out at Saswad (Ambodi Road), Khauli (Satara), and Palus (Sangli). Approximately 600 trees have been planted at MHADA's colony in Ujalaiwadi.

The Konkan Board conducted plantation at the Talye Housing Rehabilitation Project in Mahad Taluka, Raigad district with support from the local residents. Tree plantation was also carried out at Khoni, Shiradhoon, Bhandarli, and Gotheghar project sites.

The Nagpur Board has started the planting of 1,000 trees at the Mauja Nanda project (Taluka: Koparna, District: Chandrapur) under PMAY (Urban), in collaboration with PM Infraventures, Chandrapur. Chief Officer Mr. Maheshkumar Meghmale and other dignitaries were present. Additionally, 300 trees have been planted at the Mauja Devada project, and plantation activities were also conducted at MHADA's Nagpur Office and project sites in Waddhamna, Godhni, and Butibori.

In Dharashiv, Solapur district, the largest plantation initiative is scheduled to take place across 13 acres. On July 20, 2025, 15,000 trees will be planted over 8 acres in Jewli village and 5,000 trees over 5 acres in Kasti village.

All trees being planted under this initiative are eco-friendly species. The responsibility for their maintenance has been assigned to the respective housing societies. Registration and monitoring will soon be ensured through geo-tagging.

This initiative is being implemented under the directives of MHADA Vice President and Chief Executive Officer Mr. Sanjeev Jaiswal, IAS. Speaking on the occasion, Mr. Jaiswal stated, “In view of the rising pollution and global warming, this campaign is of great significance. It is not just an effort to increase green cover but a step toward securing a healthier and enriched environment for future generations. Just as building homes is essential for the state's progress, maintaining ecological balance is equally necessary. With the growth of cities, the growth of trees that provide shade must also be ensured. This is now the guiding principle of this campaign.”

Since its inception, MHADA has constructed over nine lakh homes across the state. Through this tree plantation initiative, MHADA is further upholding its commitment to environmental responsibility.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA




म्हाडा
MHADA
गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)


म्हाडा
MHADA
मुंबई
व क्षेत्रविकास मंडळ
विभाग/






वन महोत्सव कार्यक्रम २०२५
अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा प्रादेशिक घटक)


पी.एम.इन्फ्राव्हेन्चर्स तर्फे
वृक्षारोपण
प्रमुख उपस्थिती



